# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः09.06.2025** **वारःसोमवार**

---

1. विकसित भारताच्या दिशेने महिलांची भूमिका परिवर्तनकारी, गेल्या 11 वर्षांत महिलांच्या विकासाला रालोआ सरकारचं प्राधान्य, पंतप्रधानांचं प्रतिपादन
2. डीआरडीओच्या वाहन संशोधन आणि विकास संस्थेकडून नऊ संरक्षण प्रणालींचं तंत्रज्ञान 10 भारतीय उद्योगांकडे हस्तांतरित
3. आयआरटीसीटीतर्फे 'छत्रपती शिवाजी महाराज' विशेष वर्तुळ रेल्वेची घोषणा आणि
4. हरियाणा, चंदीगड, दिल्ली, राजस्थान आणि उत्तर प्रदेशातील काही ठिकाणी उष्णतेच्या लाटेची शक्यता

**पंतप्रधान**

विकसित भारताच्या दिशेने महिलांनी परिवर्तनकारी भूमिका बजावली असून गेल्या 11 वर्षांत महिलांच्या विकासावरच रालोआ सरकारचं लक्ष केंद्रित असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. महिलांनी गेल्या 11 वर्षांत विज्ञान, शिक्षण, क्रीडा, स्टार्टअप्स, सशस्त्र दलं यांसह सर्व क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करून सर्वांना प्रेरणा दिल्याचं त्यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. सेवा, सुशासन आणि गरीबांचं कल्याण या तत्वांनी प्रेरित झालेल्या भारताने गेल्या दशकात उल्लेखनीय परिवर्तन अनुभवलं आहे. या अकरा वर्षांच्या काळात महिलांच्या विकासावरही भर देण्यात आला आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडीने सुरू केलेल्या विविध योजनांच्या माध्यमातून महिला सबलीकरणाच्या दिशेने महत्त्वाचं पाऊल टाकलं आहे. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधान म्हणून आज अकरा वर्षे पूर्ण केली आहेत. त्यांचा हा तिसरा कार्यकाळ सुरू असून, 2024 मध्ये त्यांनी आजच्याच दिवशी पंतप्रधान पदाची शपथ घेतली होती.

**सर्वपक्षीय शिष्टमंडळ-अमेरिका**

काँग्रेस खासदार शशी थरूर यांच्या नेतृत्वाखाली अमेरिकेला गेलेल्या शिष्टमंडळानं काल अंतिम टप्प्यात वॉशिंग्टनमध्ये अमेरिकेचे उपाध्यक्ष जे. डी. व्हान्स आणि उप परराष्ट्रमंत्री क्रिस्टोफर लँडौ यांच्यासह विविध राजकीय नेत्यांची भेट घेतली आणि सीमापार दहशतवादाबद्दल भारताच्या भूमिकेबद्दल माहिती दिली. हे शिष्टमंडळ 3 जून रोजी अमेरिकेत पोहोचले आणि तीन दिवसांच्या कालावधीत त्यांनी कॅपिटल हिल तसंच वॉशिंग्टनमध्ये विविध बैठका घेऊन, अमेरिकेतील कायदेकर्ते, सरकारी अधिकारी यांना माहिती दिली. या शिष्टमंडळानं गयाना, पनामा, कोलंबिया आणि ब्राझीललाही भेट दिली.

**परराष्ट्र मंत्री**

परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर काल फ्रान्स, युरोपीय महासंघ आणि बेल्जियमच्या सात दिवसांच्या अधिकृत दौऱ्यावर रवाना झाले. या फ्रान्स दौऱ्यादरम्यान, पॅरिस आणि मार्सेली इथं ते भेट देणार असून फ्रान्सचे युरोप आणि परराष्ट्रविषयक मंत्री जीन नोएल बॅरोट यांच्याशी ते द्विपक्षीय चर्चा करणार आहेत. फ्रान्समधील वरिष्ठ नेत्यांसह, मान्यवर विचारवंतांशी आणि प्रसारमाध्यमांबरोबरही ते संवाद साधतील. पहिल्या भूमध्यसागरीय रायसीना संवादातही डॉ. जयशंकर सहभागी होणार आहेत.

**उत्पादन केंद्र-प्रल्हाद जोशी**

भारत जागतिक उत्पादन केंद्र बनण्यासाठी सज्ज असून सहाय्यक वातावरण, संसाधने आणि गतिशील तरुणाईमुळे देशात स्वावलंबनाचा उदय होत आहे असं केंद्रीय मंत्री, प्रल्हाद जोशी यांनी म्हटलं आहे. ते काल कर्नाटकमधील धारवाड इथं बोलत होते. भारत आलेल्या आव्हानांवर मात करत आता जगाचा तिसऱ्या क्रमांकाचा उत्पादक बनण्याच्या मार्गावर आहे. देश सर्व क्षेत्रांमध्ये, उद्योग, नोकऱ्या, शिक्षण, माहिती तंत्रज्ञान, वाहतूक, आणि वीज यांमध्ये स्वावलंबी होत असून जगातील सर्वांत मोठा निर्यातदार देश बनत असल्याचं त्यांनी सांगितलं.

**डीआरडीओ**

महाराष्ट्रातील अहमदनगर इथल्या संरक्षण संशोधन आणि विकास संघटना अर्थात डीआरडीओच्या वाहन संशोधन आणि विकास संस्थेनं नऊ संरक्षण प्रणालींचं तंत्रज्ञान 10 भारतीय उद्योगांना हस्तांतरित केलं आहे. या प्रणालींमध्ये रसायनिक, जैविक, किरणोत्सारी, अण्विक, रेकी वाहन, माउंटेड गन सिस्टीम, दहशतवादी-विरोधी वाहन आणि दंगल नियंत्रण वाहन वज्र यांचा समावेश आहे. तंत्रज्ञान हस्तांतरण समारंभाला डीआरडीओचे अध्यक्ष डॉ. समीर कामत उपस्थित होते. ऑपरेशन सिंदूर दरम्यान स्वदेशी बनावटीच्या प्रणालींनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल डीआरडीओ आणि संबंधित उद्योगाचं कामत यांनी कौतुक केलं. दरम्यान, नव्या तंत्रज्ञानावर सहकार्य करण्यासाठी वाहन संशोधन आणि विकास संस्थेनं पुण्यातील सीओईपी विद्यापीठासोबत सामंजस्य करार केला आहे.

**भारत नॉर्वे-सागरी परिषद**

केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी काल रात्री मोनॅको इथं नॉर्वेचे परराष्ट्र मंत्री आस्मंड ग्रोव्हर ऑक्रस्ट यांची भेट घेतली. यावेळी ऑक्रस्ट यांनी दहशतवादाविरुद्धच्या भारताच्या भूमिकेला पाठिंबा व्यक्त केला. दोन्ही नेत्यांनी सागरी नियोजन, आर्क्टिक संशोधन आणि नील अर्थव्यवस्थेत दोन्ही देशांमधील सहकार्य अधिक दृढ करण्यावर चर्चा केली. डॉ. जितेंद्र सिंह यांनी काल रात्री मोनॅको सागरी परिषदेलाही संबोधित केलं. नील अर्थव्यवस्थेसाठी भारताच्या वचनबद्धतेचा त्यांनी पुनरुच्चार केला. भारत-नॉर्वे एमएसपी उपक्रमाअंतर्गत पुदुच्चेरी आणि लक्षद्वीपमधील प्रायोगिक प्रकल्पांनी किनारपट्टीची धूप, जैवविविधता, मत्स्यपालन, पर्यटन क्षेत्रातील समस्यांवर मात करणे शक्य झालं आहे. जीआयएस आधारित सहावं पोर्टल ही भारताची सर्वांत उल्लेखनीय कामगिरी असून,

आंतरराष्ट्रीय महासागर दिनानिमित्त ती खुली केली जाईल, असंही त्यांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**<u>आकाशवाणी 89 वर्षे</u>**

भारतीय राज्य प्रसारण सेवेचं ऑल इंडिया रेडिओ असं नामांतरण करण्याच्या घटनेला काल 89 वर्ष पूर्ण झाली. स्वातंत्र्यानंतर, ऑल इंडिया रेडिओ सेवेचा विस्तार झाला आणि 1956 मध्ये तिनं आकाशवाणी हे नाव स्वीकारलं. आज, आकाशवाणी 591 केंद्रं चालवते, 23 प्रमुख भाषां आणि 146 उपभाषांमध्ये प्रसारण केलं जातं. देशातील 98 टक्के लोकांसह 100हून अन्य देशांमध्येही आकाशवाणी पोहोचली आहे.

**<u>आयआरटीसी</u>**

भारतीय रेल्वे खानपान आणि पर्यटन महामंडळ अर्थात आयआरटीसीटीनं ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशाला उजाळा देण्यासाठी तसंच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनकार्याचा परिचय करून देण्यासाठी, 'छत्रपती शिवाजी महाराज' या एका विशेष वर्तुळ रेल्वेची घोषणा केली आहे. ही यात्रा 'भारत गौरव टुरिस्ट ट्रेन' अंतर्गत आज पासून सुरू होत असून पहिल्या दिवशी रायगड किल्ला येथे भेट देणार आहेत. ही रेल्वे रायगड किल्ला, शिवनेरी किल्ला, प्रतापगड किल्ला, पन्हाळा किल्ला, लाल महाल, कसबा गणपती, शिवसृष्टी या ठिकाणांना भेट देणार आहे. या 5 दिवसांच्या विशेष प्रवासात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनाशी संबंधित महत्त्वाच्या ऐतिहासिक स्थळांना भेट, इतिहासावर आधारीत कार्यक्रम असणार आहेत.

**<u>मॅरेथॉन-रत्नागिरी</u>**

दक्षिण आफ्रिकेत काल पार पडलेल्या जागतिक कीर्तीच्या कॉम्रेड्स मॅरेथॉनमध्ये रत्नागिरीचे प्रसाद देवस्थळी आणि चिपळूणचे डॉ. तेजानंद गणपत्ये यांनी यशस्वी सहभाग नोंदवून ही स्पर्धा यशस्वीरीत्या पूर्ण केली.स्पर्धेचं यंदा 98वं वर्ष होतं. पिटर्समारीबर्ग ते डर्बन हे सुमारे 90 किलोमीटरचं अंतर 12 तासांत पार करणं ही या स्पर्धेची अट होती. गणपत्ये यांनी कर्करोगावर मात केलेली असून, त्यांनी यापूर्वी दोन वेळा, फिटनेस अर्थात तंदुरुस्तीचा कस पाहणारा 'आयर्नमॅन' किताब पटकावला आहे. सायकलिंगमध्येही त्यांनी 'सुपर रँडोनेअर' हा मानाचा किताब मिळवला असून देवस्थळी हे कोकणातल्या मॅरेथॉन स्पर्धांचे आयोजक आहेत, तसंच देशभरातल्या विविध मॅरेथॉन आणि अल्ट्रा मॅरेथॉन स्पर्धांमध्ये नियमितपणे भाग घेतात.

**<u>फ्रेंच ओपन टेनिस</u>**

स्पेनच्या कार्लोस अल्काराझनं जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर असलेल्या इटलीच्या जॅनिक सिनरला पराभूत करून फ्रेंच खुल्या टेनिस अजिंक्यपद स्पर्धेचे विजेतेपद पटकावलं. अत्यंत चुरशीच्या आणि या स्पर्धेच्या इतिहासातील सर्वात जास्त काळ चाललेल्या अंतिम सामन्यात अल्काराझनं जॅनिक सिनरवर 4-6, 6-7, 6-4, 7-6, 7-6 असा शानदार विजय मिळवला. या विजयासह, अल्काराझनं दुसऱ्यांदा रोलँड गॅरोस मुकुट जिंकण्यासह पाचही प्रमुख अंतिम सामन्यांमध्ये अपराजित राहून पाचवे ग्रँड स्लॅम विजेतेपदही मिळवलं. दरम्यान, महिला दुहेरीचे विजेतेपद इटालियन जोडी सारा एरानी आणि जास्मिन पाओलिनी यांनी मिळवलं. या जोडीनं अंतिम

सामन्यात कझाकस्तानच्या अना डॅनिलिना आणि सर्बियाच्या अलेक्झांड्रा क्रुनिक यांचा 6-4, 2-6, 6-1 असा पराभव केला.

**सिक्कीम**

मुसळधार पावसामुळं उत्तर सिक्कीममधील अनेक ठिकाणी दरडी कोसळल्यानं रस्ता संपर्क तुटला आहे. त्यामुळं चाटेन, लाचेन इथं अनेक पर्यटक अडकले आहेत. त्यापैकी 28 जणांना आणि 20 लष्करी कर्मचाऱ्यांना काल विमानानं हलवण्यात आलं, तर एमआय-17 हेलिकॉप्टरनं चाटेन इथं तैनात असलेल्या लष्करी कर्मचाऱ्यांसाठी आवश्यक साहित्यदेखील पोहोचवलं.

**आसाम**

आसाममधील पूर परिस्थितीत सुधारणा झाली असून, राज्यातील सर्व नद्या धोक्याच्या पातळीवरून खाली आल्या आहेत. मात्र, अद्याप 11 जिल्ह्यांमधील 740 गावांमध्ये 2 लाख 50 हजारांहून अधिक लोक पुरात अडकले असून, बचाव कार्य सुरू आहे.

**हवामान**

भारतीय हवामान विभागानं आज हरियाणा, चंदीगड, दिल्ली, जम्मू आणि काश्मीर, लडाख, पंजाब, राजस्थान आणि उत्तर प्रदेशातील काही ठिकाणी उष्णतेच्या लाटेची शक्यता वर्तवली आहे. हरियाणा, दिल्ली आणि चंदीगडमधील काही ठिकाणी रात्री उष्णतेची लाट येण्याची शक्यता असून, दिल्ली, हरियाणा, पंजाब, पश्चिम राजस्थान आणि पश्चिम उत्तर प्रदेशातील काही ठिकाणी धुळीचे वारे वाहू शकतात, असं हवामान खात्यानं म्हटलं आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.